■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २७६ ■ मंगळवार दि.२४ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 276 ■ Tuesday Dt.24 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## पेठ बीड पोलीस ठाण्यातील अनेक वादग्रस्त प्रकरणात हनुमंत उगलेचा हस्तक्षेप कशामुळे व कोणाच्या आशीर्वादाने वाचा पुढील अंकात?

## वसुली बहाद्दर पोलीस कर्मचारी अजूनही पेठ बीड पोलीस स्टेशनमध्ये मग त्यांच्यावर कारवाई का नाही?

## हनुमंत उगले यांनी मनोरुग्ण मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपींना सोडून दिल्याचा ठपका, तरीपण त्यांना काळा हनुमान ठाणा महत्त्वाची बीट दिली का?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

### एसपी साहेब, आर्थिक तडजोड करून आरोपींना सोडून देणाऱ्या हनुमंत उगलेंच्या पाठीशी तुमचा आशीर्वाद आहे का?

# हनुमंत उगलेंच्या बीटमध्ये दोन नंबर वाल्यांचा नंगानाच; वादग्रस्त हनुमंत उगलेला बीट नेमकी कुणाच्या आशीर्वादाने?

## वाळू आणि मुरूमाची वसुली हनुमंत उगलेकडे एसपी का पीआयच्या आशीवार्दाने, पेठ बीड पोलिसात चर्चा?

## हनुमंत उगले आज सुद्धा माफीयांच्या संपर्कात, पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील व बीड शहरातील अनेक मुरूम वाळू, मटका, गुटखा, पत्त्याचे क्लबचे माफिया उगलेच्या संपर्कात, उगलेंचे कॉल डिटेल तपासणे गरजेचे आहे?

- वादग्रस्त पोलीस कर्मचारी हनुमंत उगले एकूण किती फोन क्रमांक वापरतो याची पण तपासणी होणे गरजेचे?
- मटका माफियांचा वाढदिवस हनुमंत उगलेंकडून साजरा; बीड शहरात आज सुद्धा पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत मटका राजरोस सुरूच?
- एसपी साहेब काळा हनुमान ठाणा बिटमध्ये किती जाग्यावर दारू मटका गुटका याच्यासाठी एकदा पोलीस ठाणे हद्दीत पायी चक्कर अचानक माराच?

## बीड पोलिस मुख्यालयात अनेक कर्तव्यदक्ष, उल्लेखनीय कामगिरी करणारे पोलिस धुळखात पडून



बीड । प्रतिनिधी

पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अनेक अवैध राजरोसपणे सुरू आहे. आणि अवैध धंदेवाल्याकडून वसुली करणारा हनुमंत उगले हा वादग्रस्त पोलीस कर्मचारी आहे. या हनुमंत उगलेने या अगोदर गांधीनगर भागातील अवैध धंदेवाल्यांकडून वसुली केली व करत आहे. पण पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हनुमंत उगलेंवर कारवाई का करत नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या कार्यकाळात सुद्धा दोन नंबर वाल्यांची वसुली म्हणजेच अवैध जनावरांची कत्तल, वाळू, मुरूम माफीया यांचे कलेक्शन तसेच मटका दारू सह वेगवेगळ्या प्रकारचे दोन नंबर वाल्यांची वसुल करण्याची जिम्मेदारी हनुमंत उगले यांच्यावर आहे. अवैध धंदे तसेच अनेक गुन्ह्यातील आरोपींना सहकार्य करून आर्थिक तडजोड करून सोडून देण्याचे काम हनुमंत उगले यांनी केले आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील खाकी वर्दीतला वादग्रस्त पोलीस कर्मचारी म्हणून पाहिले जाते. परंतु त्यांच्यावर कुठलीही कारवाई केली जात नसल्याने यावर शंका उपस्थित होत आहे.

बीड जिल्हा पोलीस दलात काळिमा फासणाऱ्या गंभीर घडत आहेत उगले यांच्या वरदहस्तमुळे या घटना सातत्याने वाढत आहेत. एखाद्या चित्रपटाला शोभेल असे काळे धंदे मोठ्या जोमात सुरू आहेत. गुन्हेगारीत गाजलेल्या आरोपींना बळ देण्याचे काम हनुमंत उगले यांनी वारंवार केले. बीड येथील बार्शी नाका येथे असणाऱ्या वाळूमाफियांच्या संपर्कात पेठ बीड पोलीस आहेत कसे? याची सखोल चौकशी व्हायला हवी. बीड पुरता बिहार झाला असे म्हणता येईल कारण हनुमंत उगले केवळ पैसे

पान २ वर







### एसपी साहेब होम डिवायएसपी कस्तुरे याना विचारा चौकशी काय केली आणि मिडिया पासून का लपवून ठेवली?



होम डिवायएसपी उमेश कस्तुरेंकडून वादग्रस्त कर्मचारी हनुमंत उगले व अन्य जणांना बलात्कार प्रकरणातील आरोपी सोडून देणाऱ्याच्या चौकशी संदर्भात अंधारात ठेवले आहे का? तत्कालीन एसपी नंदकुमार ठाकूर यांनी या प्रकरणांमध्ये गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित प्रकरणांमध्ये विद्यमान गृह विभागाचे होम डिवायएसपी उमेश कस्तुरे यांच्याकडे संबंधित प्रकरणाची चौकशी दिली होती. त्याबद्दल एसपी नवनीत कॉवतांना होम डिवायएसपीचा अतिरिक्त पदभार असलेले उमेश कस्तुरे यानी सांगावं की, मनोरुग्ण अल्पवयीन बलात्कार प्रकरणातील नराधम आरोपींना सोडून दिले होते की नाही कारण हनुमंत उगले व अन्य पोलिस कर्मचारी सबंधित प्रकरणात दोषी आहेत का नाहीत? आणि होम डीवायएसपी यांनी संबंधित प्रकरणाचा चौकशीचा अहवाल पत्रकार व मीडियापासून लपवून ठेवला याचे उत्तर होम डिवायएसपी कस्तुरे यांनी दोषी पोलीस कर्मचारी यांना पाठीशी घातलेले आहे याचं उत्तर दिले पाहिजे?

### तत्कालीन एसपी नंदकुमार ठाकूर यांनी वादग्रस्त हनुमंत उगलेंवर केलेली कारवाई कोणाच्या आशिर्वादाने थांबली; एसपी नवनीत कॉवत साहेबांकडून उत्तराची अपेक्षा?

डायल ११२ वरती कॉल गेला हनुमंत उगले घटनास्थळी गेल्यानंतर पीडित मुलगी व पोलीस पोलीस स्टेशन पेठ बीड या ठिकाणी आरोपी व पीडित मुलीला घेऊन गेल्यानंतर रात्रीच तडजोड करून सोडून का देण्यात आले होते. याचा ठपका ठेवत तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी हनुमंत उगले वरती कारवाई केली होती परंतु वाल्मीक कराडच्या मध्यस्थीने एका पत्रकाराने पाच लाख रुपये देऊन अविनाश बारगळ यांना एक फोन करायला लावला होता. आणि तत्कालीन एसपी नंदकुमार ठाकूर यांनी केलेली कारवाई रद्द करत बारगळ यांनी हनुमंत उगलेला पुन्हा दिले होते. हनुमंत उगले हा गांधीनगर पोलीस ठाण्याची सर्व वसुली राजरोजपणे आजही करतो त्याच्या खाजगी गाडीतून सर्व वसुली चालते खाजगी गाडीतूनच ड्युटी करतो. त्यामुळे हनुमंत उगले च्या पाठीशी आता नेमका वाल्मीक करा नंतर कोणाचा आशीर्वाद आहे. हे मात्र आता जनतेला समजले नाही पण उगले कडे वादग्रस्त असताना सुद्धा महत्त्वाची समजले जाणारे काळ हनुमान ठाण्याची बीट ही देऊळ पुन्हा वसुली कोणासाठी करायचे आहे. याचे उत्तर आता बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी देणे गरजेचे आहे?

### अनेक पोलिसांना एसपी साहेबांकडून अपेक्षा?

पेठ बीड पोलीस ठाणे मध्ये आज सुद्धा वादग्रस्त पोलीस कर्मचारी सीनियर पोलीस अधिकारी कर्मचारी भाषा करतो पण पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत काय यांच्या कार्यकाळामध्ये आता पोलिसांना न्याय मिळणार अशा अफवा गेल्या काही महिन्यापासून बीड शहरामध्ये रंगू लागल्या होत्या. परंतु त्या चर्चा आता फक्त स्वप्नच होते असं म्हणावं लागेल कारण चांगल्या पोलीस कर्मचाऱ्यांना आज सुद्धा पोलीस मुख्यालय या ठिकाणी राहावे लागते. आणि वादग्रस्त भ्रष्टाचाराने बरबटलेले हत्ती वसुली करणारे अनेक पोलीस कर्मचारी आज सुद्धा वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये बीट अंमलदार म्हणून आहेत. तर त्या ठिकाणी स्वतःची कमाई करून ठाणे प्रभारी असलेल्या पोलीस निरीक्षकांची ही वसुली करतात हे कदाचित एसपी नवनीत कॉवत साहेबांना माहिती नसेल पण हनुमंत उगले सारखे वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये अनेक कर्मचारी आहेत. पण आज सुद्धा चांगल्या पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब याच्या कडून अपेक्षा आहे की आम्हाला पण पोलीस ठाण्यात नोकरी करण्यासाठी सधी एसपी नवनीत कॉवत साहेब देतील अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत?

# पालकमंत्री अजितदादांचा दुटप्पीपणा; नियोजन निधी पुण्याला वाटप करून खर्चही झाला मात्र बीडकरांना डीपीसीच्या ५७५ कोटींचे निव्वळ गाजर दाखवले

## बीडला न्याय देता येत नसेल तर पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

नियोजनाच्या निधीकडे राज्यातील सर्वच जिल्ह्यांच्या नजरा लागलेल्या असताना लाडकी बहिण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीला चांगलाच फटका बसला असुन जिल्हा वार्षिक योजना अर्थातच डीपीसीला ३ महिन्यांपासून निधी देण्यात आलेला नाही. सर्वच जिल्ह्यांच्या वार्षिक योजनेच्या तिजोरीत खडखडाट असुन त्याचा परीणाम जिल्ह्यातील विकासकामांवर झाला आहे. बीडमध्ये महिनाभरापूर्वी अर्थमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी आढावा बैठक घेऊन चालु वर्षातील सन २०२५-२६ या नव्या वर्षातील विकास कामांसाठी ५७५ कोटींच्या कामांची घोषणा केली. मात्र निधीअभावी अद्याप शासनाकडून एकही रुपयांचा निधी वर्ग झालेला नाही. त्यामुळे बीडकरांना केवळ ५७५ कोटींचे गाजर दाखवण्यात आले असल्याची प्रतिक्रिया उमटत असतानाच दुसरीकडे मात्र पुणे जिल्ह्याला नियोजनाच्या निधीतून ३ कोटी २० लाख रुपये वर्ग करून त्यातले १ कोटी १६ लाख रूपये खर्चही झाले आहेत. त्यामुळे पुणे आणि बीड दोन जिल्ह्याचे पालकमंत्री



असलेल्या अजितदादांचा दुटप्पीपणा त्यांच्या सारख्या माणसाला शोभत नसुन नाव मोठे आणि लक्षण खोटे या म्हणीप्रमाणे अजितदादांची वागणुक असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी दिली असुन बीडकरांना न्याय देता येत नसेल तर अजितदादांनी पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे.

जिल्ह्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपंचायती, नाविन्यपूर्ण योजनांसाठी सर्व शासकीय विभागांना जिल्हा नियोजन समिती मार्फत निधी वितरित केला जातो. जिल्हा वार्षिक योजनेतून हा निधी खर्च होतो. सन २०२४-२५ या आर्थिक वर्ष अखेरपर्यंत जिल्ह्यासाठी शासनाकडुन आलेला सर्व मंजुर निधी समित्यांमार्फत खर्च करण्यात आला आहे. ३१ मार्चला सर्व कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. त्यानंतर मात्र गेल्या ३ महिन्यात म्हणजेच सन २०२५-२६ या नव्या आर्थिक वर्षातील विकास कामांसाठी शासनाकडून १ रूपयाचाही निधी वर्ग झालेला नाही. त्यामुळे नियोजन समितीत कमालीची अशांतता आहे.

**नियोजनच्या निधीचा पहिला हप्ता अजित पवारांच्या पुण्यालाच बीडला दमडीही नाही**

अजितदादा पवार हे पुणे आणि बीड दोन जिल्ह्याचे पालकमंत्री असले तरी नियोजनच्या निधी वाटपात दुजाभाव केल्याचे दिसून येत आहे. पुणे जिल्ह्याला नियोजनच्या निधीतुन पहिला हप्ता ३ कोटी २० लाख वर्ग झालेला असुन त्यातले १ कोटी १६ लाख रूपये खर्चही झाले आहेत. अजितदादा पवार बीडचेही पालकमंत्री असले तरी बीडच्या खात्यावर शुन्यच अद्याप कायम असुन पुणे जिल्ह्याला नियोजन समितीच्या निधीचा ३ कोटी २० लाख रुपये वर्ग झालेला निधी तातडीच्या खरेदीसाठी होता असंही नाही तर नियोजन समिती सक्षमीकरण या हेडखाली त्यातील १ कोटी १६ लाख खर्चही झाले आहेत. याचवेळी बीड जिल्ह्यातील जलजीवन सारख्या महत्वाच्या योजनेतील ५०५ कामांचे तब्बल १३२ कोटी रुपये सुद्धा अजितदादा पवार वेळेवर देत नसल्याने जर अजितदादांना बीडला न्याय देता येत नसेल तर त्यांनी बीड पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# विश्वनाथ राठोड यांची राष्ट्रसंत रामराव महाराज बंजारा समाजिक महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील सिरसाळा परिसरातील रामनगर तांडा येथील गाव



कुशाबाहेर राहणारा एक व्यक्तिमत्व गरीब कुटुंबात जन्मलेल्या व्यक्तीचा सन्मान त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेतल्यामुळे एवढा मोठा अभिमान मिळाला आहे. विश्वनाथ राठोड यांची सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

ते अगदी दहा वर्षाच्या कालावधीपासून सतत सामाजिक राजकीय क्षेत्रामध्ये निष्ठा व इमानदारीने कार्य करत आहेत. सर्वसामान्याची जाणीव ठेवून दे सतत निस्वार्थ आपले कार्य करत असतात त्यामुळे त्याची बंजारा समाजामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये जनसंपर्क असल्यामुळे राष्ट्रसंत रामराव महाराज बंजारा समाजिक महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अंकुश जाधव यांनी व बंजारा समाजाची काशी जात म्हणले असलेले पोहरादेवीचे महंत तथा विधान परिषद आमदार बाबूसिंग महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वनाथ राठोड रा. रामनगर तांडा हिवरा गो. ता.परळी जिल्हा बीड यांची ह्या संघटनेच्या महाराष्ट्र राज्याच्या प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. या निवडीमुळे विश्वनाथ राठोड यांचे सर्व थरातून अभिनंदन होत आहे.

# महायुतीमुळे भटक्या -विमुक्तांच्या पालावर प्रशासन : डॉ.लक्ष्मण जाधव

बीड । प्रतिनिधी

आज सोमवार दि.२३/६/२०२५ रोजी व्ही.आय.पी.लॉन्स पेठ बीड विभागात महाराष्ट्र राज्य भटक्या -विमुक्त विकास परीषद वतीने महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने राजे उमाजी नाईक महाराजस्व अभियान व छत्रपती शिवाजी महाराज महराजस्व अभियान अंतर्गत भटक्या -विमुक्त जातीतील लोकांना केंद्र व राज्य सरकारच्या योजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारे प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब, लोकनेत्या ना. पंकजाताई साहेब मुंडे व लोकप्रिय दबंग मा.खा.डॉ.प्रीतमताई साहेब मुंडे यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षांपासून भटक्या -विमुक्त जाती जमातींच्या शासकीय योजनांचा पाठपुरावा गेल्या २५ वर्षांपासून सुरू होता. यामध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना, जातप्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, मतदान कार्ड, आधारकार्ड, संजयगांधी निराधार योजना, भटक्या -विमुक्तांसाठी पंतप्रधान आवास घरकुल योजना, श्रावणबाळ योजना, आयुष्यमान आरोग्य कार्ड, जन्मदाखला इ. प्रमाणपत्र भटकंती करत असल्याने अडचणी निर्माण होत होत्या, कोणतेही शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रमाणपत्र आवश्यक होते परंतु मिळत नव्हते यासाठी वेळोवेळी आंदोलने, मोर्चा, उपोषण, निवेदन देणं यासारखे मार्ग अवलंबून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू होते. आता राज्य सरकारने राजे उमाजी नाईक महाराजस्व अभियान व छत्रपती शिवाजी महाराज महराजस्व अभियान अंतर्गत कागदपत्रे सुलभपणे वितरण करण्यासाठी राज्य सरकारने आदेशित केले आहे.

यामुळेच भटक्या -विमुक्त जाती जमातींच्या वस्ती, वाडे, पाडे, तांडे, ग्रामीण व शहरी भागात जाऊन वरील प्रमाणपत्र काढण्यासाठी शासकीय स्तरावर अभियान राबविण्यात येत आहेत. या आवश्यक प्रमाणपत्र मिळाल्यावर केंद्र व राज्य सरकारच्या या समुहासाठी शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, तसे पाठपुरावा करुन हया घटकांच्या उत्थानासाठी लोकनेत्या ना.पंकजाताई साहेब मुंडे, दबंग मा.खा.डॉ.प्रीतमताई साहेब मुंडे, भाजपा भटक्या -विमुक्त आघाडी प्रदेश अध्यक्ष राहुल केंद्रे व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान जिल्हाभरात राबविण्यासाठी भाजपा भटक्या -विमुक्त आघाडी बीड जिल्हाध्यक्ष या जबाबदारीने प्रयत्नशील राहणार आहोत.

यावेळी भाजपा भटक्या -विमुक्त आघाडी बीड जिल्हाध्यक्ष मी डॉ.लक्ष्मण जाधव या जबाबदारीने उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले व प्रशासकीय अधिकारी यांना या समुहातील अनेक मागण्या पूर्ण करण्यासाठी आवाहन करण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी धार्मिक साहेब, तहसीलदार शेळके, नायब तहसीलदार, महसूल विभाग अधिकारी, मंडळ अधिकारी,तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य विभाग अधिकारी, नगरपरिषद अधिकारी इ.उपस्थित होते.

यावेळी प्रस्तावित भटक्या -विमुक्त हक्क परीषद जिल्हा संयोजक ओमप्रकाश गिरी यांनी केले. यावेळी भटक्या विमुक्त हक्क परीषद मराठवाडा विभाग संयोजक जोगी सर, डॉ.सुभाष जोशी सर, डॉ.पैठणकर सर, भाजपा नेते भूषण पवार, मिराताई गांधले, शिवसेना शिंदे गट नेते मनोज चव्हाण, राष्ट्रवादी युवा नेते अमर ढोणे, मसणजोगी समाज अध्यक्ष हनुमंत मोरे आदी जण उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला प्रमाणपत्र वितरण हस्तगत करण्यासाठी भटक्या -विमुक्त जाती जमातीतील अनेक गरजवंत उपस्थित होते.

# योगतज्ञ डॉ.राधा तांबे 'योग रत्न' पुरस्काराने सन्मानित

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या नावात डॉ.राधा तांबे यांनी मानाचा तुरा रोवला आहे. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन तर्फे छत्रपती संभाजीनगर २२ जून २०२५ रोजी योग, आयुर्वेद, युनानी आणि नॅचरोपॅथी मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना पुरस्कृत करण्यात आले. जागतिक योग दिनानिमित्त या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातून सुमारे ५००० इच्छुकांनी या पुरस्कारासाठी अर्ज केला होता. त्यातून निवड समितीने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय खेळाडू, प्रशिक्षक व योगाचार्य यांची निवड केली. यामध्ये बीड जिल्ह्यात प्रख्यात असणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग



खेळाडू व योगतज्ञ श्रीमती राधा सचिन तांबे यांची 'योग रत्न' पुरस्कारासाठी निवड झाली. प्रा.आ. केंद्र चऱ्हाटा ता. जि.बीड येथे त्या कोविड काळापासून रूग्णांना नियमित पणे उपचारात्मक योग शिकवत आहेत. त्यांनी आतापर्यंत हजारो लोकांना निरोगी आणि सुदृढ जीवन जगण्याची योग कला शिकवली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे हा पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे श्रीमती राधा तांबे यांचे जिल्हाभरात कौतुक केले जात आहे.

# जिल्हास्तरीय स्विमिंग स्पर्धेत कु.शितल कोकाट जिल्ह्यात प्रथम

जातेगाव । प्रतिनिधी

माजी आमदार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त, ॲड.स्वप्निल येवले, संदीप राजगुरू स्वीमिंग गुरु पूल केअर, गेवराई शाखेच्या वतीने तालुकास्तरावरील जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे उद्घाटन मा.श्री.अमरसिंह पंडित साहेब, माजी नगरसेवक राधेशाम येवले यांच्या शुभहस्ते झाले. विविध वयोगटांतील या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथील सहशिक्षक श्री.महादेव कोकाट यांची कन्या कु.शितल कोकाट हिने आज गेवराई येथे झालेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत भाग घेऊन जिल्ह्यातुन प्रथम क्रमांक मिळविला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस श्री.अमरसिंह पंडित साहेब यांच्याहस्ते कु.शितलला प्रमाणपत्र व गोल्ड मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.



या स्पर्धे मध्ये अनेक स्पर्धकांनी यामध्ये सहभाग नोंदला होता वयोगट १४ ते १६ यामध्ये अटीतटीच्या लढतीत कु.शितल कोकाट हिने बाजी मारून जिल्हास्तरीय स्विमिंग स्पर्धेत प्रथम येण्याचा मान मिळविला. स्पर्धे वेळी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी उपसभापती सचिन मोटे, दादासाहेब घोडके, अरुण चाळक, ॲड.राजेश बहीर, ॲड.श्रीनिवास ढाकणे, ॲड.मनोज हजारे, संतोष सुतार, अमित येवले, स्विमिंग गुरु पूल केअरचे प्रशिक्षक राहुल झंपलवार, दीनानाथ प्रधान, शैलेश कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने पालक व स्पर्धक उपस्थित होते. कु.शितल कोकाट हिने जिल्हास्तरीय स्विमिंग स्पर्धेत प्रथम येण्याचा मान मिळविला त्या बद्दल शितल चे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

# यशवंत विद्यालयात कौतुकायल पुरस्कार सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

शहरातील यशवंत विद्यालय या शाळेमध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२५ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा कोतुकायन पुरस्कार सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या ज्येष्ठ मार्गदर्शिका सुधामतीताई वाघ, तर प्रमुख पाहुणे म्हणून बीड विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार प्रा.सुनील धांडे, शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश वाघ, संस्थेचे सचिव नामदेव वाघ, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते नवनाथरावजी पवार, शिवसेनेचे युवा नेते शशी सानप, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक धुमाळ एम.एस. हे




उपस्थित होते.

यावेळी प्रथम क्रमांक श्रावणी बाळासाहेब मुळे, द्वितीय क्रमांक पूजा जगन्नाथ तावरे, तृतीय क्रमांक शौर्य राधाकिसन नांदे, आयटी प्रवेश प्राप्त शाळेचा माजी विद्यार्थी, राजवीर कोकाट, एन.एम.एम.एस. परीक्षेतील गुणवंत विद्यार्थिनी नम्रता गवते, नीट परीक्षेत यश मिळवणारा संदेश फाळके यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे सुनीलजी धांडे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये सातत्याने मेहनत करावी तरच यश मिळते. परिस्थिती कोणतीही असो त्याला डगमगू नये.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेचे शिक्षक गाडेकर के.बी.यांनी तर सूत्रसंचालन शेळके एम.बी.यांनी केले. मुख्याध्यापक गणेश वाघ यांनी उपस्थित आमचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# उद्योगपती हनुमंत जंजीरे यांना मातृशोक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कुंबेफळ येथील गोविंद उद्योग समूहाचे अध्यक्ष



तथा प्रसिद्ध उद्योगपती हनुमंत रावसाहेब जंजिरे यांच्या मातोश्री गं.भा. तुळसाबाई रावसाहेब जंजिरे (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्यावर त्यांच्या मूळगावी कुंबेफळ येथे रविवार दि.२२ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वा. अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यापाठीमागे हनुमंत जंजिरे मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

अंत्यविधीस देविदास धस, राजाभाऊ दरेकर, परमेश्वर शेळके, ॲड. हनुमंत थोरवे, जयसिंग गव्हाणे, यशवंत खंडागळे, सभापती शत्रुघ्न मरकड, तालुकाध्यक्ष सुनील नाथ, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, प्रविण पोकळे, चेअरमन शांतीलाल भोसले, सरपंच मनोज थोरवे, सदाशिव मिसाळ, शिरीष थोरवे, पांडुरंग जंजिरे, भारत जाधव, बाळासाहेब शिंदे, बन्सीभाऊ पोकळे, दतोबा वाडेकर, बिट्टू पोपळे, बाळासाहेब थोरवे, भाऊसाहेब झांजे, राजाभाऊ शेळके, महादेव मुंगसे, संजय थोरवे, महेबूब सय्यद, रामदास शेंडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रविकांत वारंगुळे, पोपट धुमाळ, शिवाजी धस, श्रीनिवास पोकळे, पवन चौधरी, के.के. काकडे, गोलेकर साहेब, भारत गव्हाणे, डॉ.दत्तात्रय गणगे, सिताराम झांजे, रावसाहेब भस्मे, चेअरमन गोवर्धन धस, भाऊसाहेब काळे, आर.डी.शिंदे, गजबा शिंदे, बाबासाहेब जाधव यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# ख्रिश्चन धर्मगुरूंना जिवे मारण्याची सुपारी देणारा व समाज समाजामध्ये भांडणासाठी प्रवृत्त करणारा गोपीचंद पडळकर ला विधानसभा सदस्य पदावरून बडतर्फ करावे : राजन नायर

बीड । प्रतिनिधी

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून आज अनेक वर्षे पूर्ण झाली आहेत. भारत हा धर्म निरपेक्ष देश आहे. वेगवेगळ्या जाती धर्माचे लोक या देशात गुण्यागोविंदाने नांदत आहेत. पण काही समाज कंटक असे आहेत की, ते लोकांच्या मनात धर्म धोक्यात आहे, धर्मांतरण, इतर धर्मासाठी अश्लील भाषेचा वापर करून इतर धर्माविरोधी बोलणे अशा प्रकारे लोकांच्या मनात व्देष निर्माण करून एकमेकांविरूध्द उभे करून सामाजिक शांतता भंग करत आहेत.

मागील १० ते १५ वर्षे पासून कित्येक ठिकाणी चर्च ची तोडफोड, धर्मगुरू वर हल्ले करून समाजावर अतोनात अन्याय व अत्याचार सुरू झाला आहे. ख्रिस्ती समाज व शांती प्रिय समाज आहे. सर्व समाजाच्या विकासासाठी या समाजाचा मोठा वाटा आहे, सहभाग आहे. शिक्षण, आरोग्य, महिला सशक्तीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन अशा अनेक माध्यमातून ह्या समाजाने सहकार्य केले आहे.

महाराष्ट्र, जो शिव शाहू फुले आंबेडकर यांनी घडविला ज्या महाराष्ट्रात सर्व जाती






धर्मातील लोकांना एक नजरेने, एका स्तरावर पाहिले जाते, जे एकमेकांशी बंधु प्रेमाने राहतात अशा महाराष्ट्रात गोपीचंद पडळकर सारखा व्यक्ती स्वत:ला सुशिक्षित, सामाजिक नेता म्हणणारा व्यक्ती लोकांच्या मनात ख्रिस्ती धर्माविरोधात विष कालवून त्यांच्या अन्याय व अत्याचार करण्यासाठी तरूणांना प्रोत्साहन देत आहे. ख्रिस्ती धर्मगुरू कोणालाही धर्म स्विकारण्यास जबरदस्ती करत नाही. संविधान मध्ये दिल्याप्रमाणे धर्म बदलणे, स्विकारणे हे त्या व्यक्तीचा अधिकार आहे, त्या व्यक्तीवर अवलंबून आहे. परंतु या 'धर्मांतरण' शब्दाचा आधार घेऊन गोपीचंद पडळकर याने उघडपणे ख्रिस्ती धर्मगुरूंना जिवे मारण्याची सुपारी दिलेली आहे यातून त्याची गुंडप्रवृत्ती दिसून येते.

धर्मांतरण संस्कृती, संस्कार, विचारधारा, राहणीमान सोडण्यास प्रवृत्त करत नाही ते त्या व्यक्तीवर अवलंबून असते. समाजामध्ये प्रत्येक जण एकमेकांच्या धर्माचा, भावनेचा आदर करतो पण गोपीचंद पडळकर याने आपल्या भाषणात उघडपणे उध्दट, शिवीगाळ भाषा, धर्मगुरूंना मारण्याची तरूण मुलांना फुस लावली. (लव जिहाद करणारे हिरवे साप आहेत, तसे धर्मांतरण करणारे, सेवेच्या नावाखाली गोंडस दिसणारे हे अजगर आहेत.) असे वक्तव्य केले सामाजिक वातावरण दूषित करणारे समाज कंटक विरुद्ध कडक कार्यवाही करण्यात यावी.

मुख्यमंत्री साहेब आपणासोबत असणारे राम सातपुते यांनी सोलापूर येथे खासदार पद मिळावे म्हणून पंडिता रमाबाई संस्थेविरोधात व नितेश राणे याने मंत्री बनण्यासाठी मुस्लिम बांधवांना विरूध्द व्यक्तत्व केले. सरकार अशा लोकांना पाठीस घालते. गोपीचंद पडळकर हा व्यक्ती फुकट प्रसिद्धी, मुख्यमंत्री व बिजेपीचे लक्ष केंद्रित करून मंत्री बनण्यासाठी ख्रिस्ती समाजावर घाणेरडे आरोप करत आहे अशा व्यक्तीवर लवकरात लवकर कार्यवाही करून त्याला अटक करून त्याचा विधानसभा सदस्य पदाचा राजीनामा घ्यावा. लोकशाही राज्यात ख्रिस्ती धर्मगुरूंना मारण्याची उघडपणे सुपारी दिली जात आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही धर्मगुरू ला काही झाले तर हा गोपीचंद पडळकर व्यक्ती जबाबदार राहिल.

ख्रिस्ती समाजाचे तरूण या अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरल्यास महाराष्ट्रात कसे वातावरण निर्माण होईल याबाबत कल्पना नाही तरीही मुख्यमंत्री साहेब व गृहमंत्री साहेब आपणांस निवेदन आहे की, आपण या गोष्टी कडे दुर्लक्ष न करता अशा धर्माबद्दल व धर्मगुरू बद्दल निच व्यक्तत्व करणार्या गोपीचंद पडळकर याचा राजीनामा त्वरित घ्यावा व त्याच्या विरोधात कार्यवाही करावी अन्यथा ख्रिस्ती समाजाचा आपणां प्रति असलेला विश्वास कमी होईल. अल्पसंख्याक विभाग मंत्री दत्ता भरणे साहेब व अल्पसंख्याक आयोग अध्यक्ष प्यारे खान साहेब यांना विनंती आहे की गोपीचंद पडळकर या व्यक्ती पासून समाजाला धोका आहे तरी आपण याबाबत योग्य निर्णय घ्यावा. मुख्यमंत्री साहेब याबाबत काही निर्णय घेतील असे वाटत नाही पण आदरणीय उपमुख्यमंत्री अजित दादा आपणा कडून ख्रिश्चन समाज व अल्पसंख्याक समाज यांस खूप अपेक्षा आहे.

# धोकादायक बनलेल्या ५३ जिल्हा परिषद शाळांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

## अनेक शाळा दुरुस्तीचे, नूतनीकराचा प्रस्ताव जिल्हा परिषद प्रशासनाकडे धुळखात पडून

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या २७७ शाळांपैकी ५३ शाळांच्या इमारतीची पडझड झाल्याने धोकादायक बनल्या आहेत, या संदर्भात ग्रामस्थांनी जिल्हा परिषद प्रशासन व शासनाकडे शाळा इमारत बांधकामासाठी निधीची मागणी केली आहे. त्याच प्रमाणे स्थानिक प्रशासनाने दुरुस्ती व नूतनीकरणाचा अहवाल जिल्हा परिषद प्रशासनाकडे पाठवला आहे. परंतु सर्व अहवाल प्रशासनाकडे धुळखात पडून आहेत. आज सोमवार पासून उन्हाळी सुट्यानंतर शाळा पुन्हा सुरु झाल्या आहेत. परंतु ५३ शाळांमधील विद्यार्थ्यांना इमरात दुरुस्ती अभावी गळती होणाऱ्या व पडझड झालेल्या वर्गखोल्यांमध्येच शिक्षण घ्यावे लागणार आहे.



शासनस्तरावरून शिक्षण व आरोग्य व स्वच्छतेसाठी मोठा निधी दिला जातो. दरवर्षी शिक्षण विभाग शाळेतील विद्यार्थी गळतीचे प्रमाण थांबवण्यासाठी मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश वाटप, शालेय पोषण आहार या सारख्या योजना राबवते. याही वर्षी शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके मिळाली असल्याचे शिक्षण विभाग सांगत आहे. परंतु शाळेच्या वर्ग खोल्यांचा छत पडलेला तर काहींना छिद्र, भिंतींना पडलेल्या भेगा त्याच प्रमाणे शाळा परिसराची दुरुस्तीअभावी झालेली दुरावस्था ही मात्र कोणीही पाहण्यास तयार नाही. यामुळे यंदाही माजलगाव तालुक्यातील मोडकळीस येवून धोकादायक बनलेल्या ५३ शाळांमधील विद्यार्थ्यांना भर पावसाळ्यात गळक्या वर्गखोल्यांमध्ये शिक्षण घ्यावे लागणार आहे.

स्थानिक प्रशासनाने वरिष्ठांना शाळेच्या दुरुस्ती संदर्भात अहवाल पाठविलेला आहे. परंतु तरी देखील प्रशासनाने शाळांच्या इमारत दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले. ही बाब अत्यंत संतापजनक आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षीतपणाबद्दल ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला असून येत्या काळात प्रशासनाचे लक्ष घोकादायक शाळा इमारतींकडे वळवण्यासाठी जिल्हा परिषद मुख्यालयातच शाळा भरवण्याचा मार्ग अवलंबवावा लागेल अशी संतप्त भावना पालकांमधून व्यक्त होत आहे.

### संबंधित अहवाल आता शासनाकडे पाठवला

वरिष्ठ कार्यालयास नादुरुस्त धोकादायक इमारतीबद्दल माहिती कळवलेली आहे. वरिष्ठ पातळीवर आणखी काही उपाययोजना झालेल्या नाहीत. शाळांची दुरावस्था झालेली असताना देखील शिक्षकांना अध्यापन कार्य अशा इमारतींमध्ये करावे लागत आहे. यामुळे विद्यार्थी व शिक्षक त्रस्त असुन पावसाळ्यात शाळा नेमकी भरवणार कशी असाही प्रश्न पडला. त्यासाठी वरिष्ठ पातळीवरून उपाययोजना होण्याची अपेक्षा आहे.

**–आर.व्ही. महामुनी,** गटशिक्षणाधिकारी माजलगाव

पुनंदगावच्या शाळेत मूळ इमारत दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे. शाळेचे किचन सेड दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे. शाळा व ग्रामपंचायत ही एकाच ठिकाणी असल्यामुळे ग्रामपंचायतकडे येणाऱ्याची संख्या व शाळेत येणारा जाणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. पण शाळेला कंपाउंड वॉल असतानाही गेट नाही. ग्रामपंचायतला वारंवार अर्ज करूनही ग्रामपंचायत शाळेसाठी आलेला निधी देण्यात उदासीनता दाखवत आहे. त्यामुळे शालेय शिक्षण समितीची बैठक घेऊन बीडीओ, सिओ यांच्याकडे शाळा दुरुस्ती व इतर आवश्यक साहित्य व वस्तूंसाठी निधीची मागणी करणार.

**– पुनम अनंत घडसिंगे,** शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पुनंदगाव

# नागेबाबा सभासद सुरक्षा कवच योजनेअंतर्गत मयत सभासद यांच्या वारसास दहा लाखाचा धनादेश

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट कडा शाखेचे खातेदार सभासद लिंबोडी येथील कै. संदीप अश्रुबा आंधळे यांच्या वारसास नागेबाबा मल्टिस्टेटच्या वतीने मयत सभासद यांच्या नागेबाबा सभासद सुरक्षाकवच योजनेअंतर्गत दहा लाख रूपयेचा धनादेश प्रदान करण्यात आला.



श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट संस्था वर्षाचे ३६५ दिवस ग्राहकांना सेवा देताना केवळ आर्थिक क्षेत्रात कार्य न करता आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो या उद्देशाने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय कडूभाऊ काळे सर यांच्या मार्गदर्शनातून व संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी जपत धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व सभासदांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य करत आहे. संस्थेतील प्रत्येक सभासद हा आपला परिवारातील घटक आहे. याचा विचार करून आपल्या संस्थेतील सभासदांसाठी नागेबाबा सभासद सुरक्षा कवच योजना चालू केलेली यामध्ये अपघाती मृत्यू झाल्यास सभासदांच्या वारसांना १० लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत करण्यात येते तसेच अपघात झाल्यास ५ लाख रुपयांपर्यंत हॉस्पिटल खर्च देण्यात येतो. या योजनेतून त्या कुटुंबाचा खरा आधार देण्याचे काम संस्था करत असते. श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट कडा शाखेचे खातेदार सभासद कै. संदीप अश्रुबा आंधळे यांचे मागील काही दिवसांपूर्वी अपघाती निधन झाले. त्यांनी नागेबाबा सुरक्षा कवच योजनेअंतर्गत नाव नोंदणी केलेली होती. आज त्यांच्या वारसास १०,००,००० रुपये किमतीचा धनादेश नागेबाबा मल्टिस्टेटच्या वतीने शाखेचे खातेदार व मान्यवरांच्या उपस्थितीत सुपूर्त करण्यात आला. कै. संदीप आंधळे यांच्या मागे पत्नी विद्या आंधळे, दोन लहान मुली, आई-वडील असे कुटुंब आहे.

यावेळी ह.भ.प.विष्णू महाराज आंधळे, लिंडोबी ग्रामपंचायतचे सरपंच अनिकेत आंधळे, मा.सरपंच समाधान आंधळे, मा. सभापती बाबासाहेब आंधळे, गोरख आंधळे, शिवाजी आंधळे व इतर ग्रामस्थ, नागेबाबा परिवारातील सदस्य राजूभाऊ चिंधे, राऊत रेवणनाथ नितिन घोडके, आशिष शिंदे, प्रवीण राख उपस्थित होते तसेच नागेबाबा मल्टीस्टेट कडा शाखेचे पालक अधिकारी देविदास कदम सुरक्षा कवच अधिकारी योगिता पटारे, एरिया डेव्हलपमेंट ऑफिसर सचिन बोडखे, शाखाधिकारी वंजारे नवनाथ, कर्डीले लहू, तांबे दादासाहेब, साळुंके अक्षय उपस्थित होते.

# सिरसाळा ग्रामपंचायतीने गावातील नाली साफसफाई, स्वच्छता मोहीम राबवली

## ग्रा.प.सिरसाळा सफाई कामगार नसल्याने कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने नाली सफाई चे काम चालू

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा गावातील सर्व सुजाण नागरिकाना जाहीर अवाहान करण्यात येते की आपल्या ग्रामपंचायतला नालीसफाई कर्मचारी नसल्यामुळे सरपंच सोहेल पठाण व टिम यानी असे निर्णय घेतले आहेत. की गावातील सर्व नाली पावसाअभावी पूर्णत स्वच्छ करून करण्यासाठी बाहेरून नाली सफाई कामगार व कॉन्टॅक्ट वर काम करण्यासाठी आलेली आहेत. वार्ड क्रमांक १ पासून ते शेवटच्या टोकापर्यंत कामाला सुरुवात होणार आहे. सर्वांना विनंती आहे की आपल्या घरासमोरील नालीवर जे काही सामान आहे. विटा असो किंवा फरशी गाडी विटा वाळू लाकूड व पत्रे इत्यादी प्रकारच्या वस्तू असे काही नालीस साफ करते वेळेस नाली कामगारांना अडथळा निर्माण करू नये यासाठी तुम्ही तुमच्या समोरील नाल्यावर काय सामान असेल तर तुमच्या घरासमोर नाली स्वच्छ होणार नाही याची दक्षता स्वत: आपली जिम्मेदारी आहे. यासाठी सिरसाळा ग्रामपंचायत ने नावली सफाई करण्यासाठी जी मोहीम राबवली आहे ती गावचे सरपंच ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय सिरसाळा यांनी ही स्वच्छता मोहीम राबवली आहे. तरी सर्व जनतेने सहकार्य करावे ही विनंती करण्यात येत आहे.



# सिरसाळा पोलीसाची धडाकेबाज कामगिरी गंगात जाऊन वाळु माफियावर केली कारवाई

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा परळी तालुका या आधिच डेंजर झोंन मध्ये असताना तरीही वाळु माफियावर परीणाम झाल्या सारखा दिसून येत नाही. यामुळेच सिरसाळा पोलीसानी कंबरकसुन गंगात जाऊन धडाकेबाज कार्यवाही केली आहे. गेल्या काही दिवसापासून तेलसमुख शिवारात गोदावरी नदीच्या पात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळूचा अवैध उपसा सुरू असल्याची माहिती शिरसाळा पोलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे अचानक छापा टाकण्यात आला. बेकायदेशीर वाळु उपशावर पोलीस प्रशासनाने कारवाई करत या कारवाईत वरील तारीख वेळी तेलसमुख तालुका परळी येथील गोदावरी नदी न्यू हॉलांड कंपनीचे बिना नंबर चे ट्रॅक्टर दोन चाकी टॉली आर्धवट भरलेली आदाजे एक ब्रास मिळुन आल्याने दोन चाकी डम्पिंग ट्रॉलीमध्ये अवैध वाळूचा उपसा करून टॉलीमध्ये भरून तिची चोरटी वाहतूक विक्री करण्याच्या उद्देशाने ट्रॉली भरत होता.



पोलीस आल्याचे पाहून पळून गेला. या प्रकरणी पोहे.कॉ.विश्वजीत विश्वंभर देवकते याच्या फिर्यादीवरून ट्रॅक्टर मालक ताहेर रशीद सय्यद राहणार लिंबा तालुका पाथरी जिल्हा परभणी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेमुळे वाळू माफिया मध्ये खळबळ उडाली आहे. प्रशासनाने अवैध उपसा वाळूविरोधात कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरक्षक गोरखनाथ दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहे.कॉ. सचिन वंजारे हे करीत आहे.



राष्ट्रीय एकतेचे पुरस्कर्ते, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत आणि भारतीय जनसंघाचे संस्थापक श्रद्धेय डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांना स्मृतिदिनानिमित्त कडा ता.आष्टी येथील भाजप कार्यालयात भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी प्रतिमा पूजन करुन अभिवादन केले. यावेळी श्री दिलीप परदेशी, अशोक पवळ, अरुण देवकर, महेश पवळ, संदीप दाणी, काशीनाथ कर्डीले, संजय कर्डीले, नागेश कुऱ्हाडे, मनोज धर्माधिकारी आदी उपस्थित होते.

# एकास काठी, कोयत्याने मारहाण

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील रामेश्वरवाडी (हंगेवाडी) येथील शिवाजी सिताराम मोराळे यांचा मुलगा श्रेयस हा ऋषभ रमेश आंधळे या मुलासोबत खेळत असताना त्यांना छकुली रामहरी हांगे या महिलेने इथे कशाला खेळतात असे म्हणत शिवीगाळ करीत होती. यावेळी शिवाजी मोराळे यांच्या पत्नी मनिषा यांनी मुलांना शिव्या का देता असे विचारले असता मुले खेळताना आरडा ओरड करीत असल्याने त्रास होतो असे म्हणत त्यांच्या पत्नीला शिवीगाळ केली. भांडणाचा आवाज ऐकून गेलेले शिवाजी मोराळे यांना थांबा, तुम्हाला दाखवते असे म्हणत तिचे पती रामहारी बाबुराव हांगे व सासरे बाबुराव राजाराम हांगे यांना फोन करून बोलावून घेतले. रामहारी याने कोयत्याने हाताचे बोटांवर मारून दुखापत केली. तर बाबुराव यांने काठीने मांडीवर मारून मुक्कामार दिला. तर किशकिंदा हांगे व छकुली हांगे यांनी त्यांच्या पत्नी मनीषा यांच्या डोक्याच्या केसांना पकडून चापटाबुक्याने मारहाण करीत तुम्हाला येथे राहु देणार नाहीत, तुम्ही जर येथे दिसलात, तर तुम्हाला जिवे मारून टाकतोत अशी धमकी दिली. अशी तक्रार शिवाजी मोराळे यांनी दिल्यावरून रामहारी हांगे, बाबुराव हांगे, छकुली हांगे, किशकिंदा हांगे या चौघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार उमेश आघाव हे करीत आहेत.

# माजलगाव गटशिक्षणाधिकारी यांना निलंबित करा

## शिक्षण संचालकाकडे मुस्ताक कुरेशी यांची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील शाळा १००% अनुदानित असताना असताना सुद्धा त्या ठिकाणी संस्थेच्या नावाखाली संस्थेच्या नावाची पावत्या देण्यात येत आहे तसेच विचारपुस केल्यास जवाब देण्यात येते की कॉम्पुटर फीस आहे, असे सांगितले जाते. अनेक वर्षे पासून याठिकाणी ऍडमिशनच्या नावाखाली एक गोरख धंदा सुरू झालेला आहे याची माहिती गटशिक्षणाधिकारी यांना माहित असताना पण काहीच कार्यवाही करित नाही फक्त तक्रार आले तर चौकशी करून चुकीचे अहवाल तयार करून वरिष्ठ अधिकारी यांना पाठवितात आणि काही कारवाई करित नाही. तसेच शाळेमध्ये ऍडमिशनच्या नावाखाली फीस स गोळा करून गोरगरीब विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी प्रवेश मिळत नाही तसेच माजलगाव शहरातील शाळेवर यापूर्वीही शिक्षकावर गुन्हे दाखल सुद्धा झालेले आहेत.



माजलगाव शहरातील व शंभर टक्के अनुदानित शाळेमध्ये तात्काळ चौकशीचे आदेश काढण्यात यावे व विद्यार्थ्यांच्या पालकांसमोर व विद्यार्थ्यांच्या ऍडमिशन किती पैसे घेऊन ऍडमिशन करण्यात आले याची संपूर्ण चौकशी करून योग्य ते गुन्हे दाखल करण्यात यावे. माजलगाव शहरातील अनुदानित शाळेत प्रवेश करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी यांच्या कडून शाळेत प्रवेश देण्यासाठी डोनेशन, कॅम्पुटर फीस, परीक्षा फीस असे कोणतेही कारण काढून प्रवेश फीस आकारण्यात येत आहे.

प्रशासन कडून गोरगरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नाही म्हणून बस सेवा मोफत करण्यात आली शिष्यवृत्ती योजना व विद्यार्थ्यांच्या बँक पासबुक मध्ये सुद्धा पैसे टाकण्याचा काम प्रशासन करीत आहे तसेच विविध योजना आज राबविले जात आहेत. परंतु आज अनुदानित शाळेत. प्रवेश देण्यासाठी प्रत्येक विद्यार्थीकडून पैसे घेऊन प्रवेश दिले जात आहे. शंभर टक्के अनुदानित शाळेकडे दुर्लक्ष करणाऱ्या गटशिक्षणाधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करून निलंबित करण्यात यावे. तसेच शहरातील सर्व १००% टक्के अनुदानित शाळांची चौकशीचे आदेश काढण्यात यावे. विद्यार्थ्यांच्या पालकांची चौकशी करून किती रुपये घेऊन ऍडमिशन करण्यात आले याची संपूर्ण माहिती घेऊन ज्या शिक्षक व अधिकारी यांनी डोनेशन व कम्प्युटर पीस काहीतरी कारण काढून विद्यार्थ्याकडून पैशाची वसुली केलेली आहे अश्या शिक्षक अधिकारी वर गुन्हे दाखल करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र युवक प्रतिष्ठान जिल्हा अध्यक्ष यांनी ईमेल व्दारे शिक्षण विभाग संचालक कड केली आहे.

# शिवसेनेच्या वतीने संत मुक्ताई पालखी तील सर्व वारकऱ्यांसाठी आरोग्य शिबिर



बीड । प्रतिनिधी

दि.२३-६-२५ रोजी बीड येथे संत मुक्ताई पालखी यांचे आगमन झाले असता पालखी मधील सर्व वारकरी यांना वेगवेगळ्या आजार दुखणे होऊ नये व झाल्यास त्यावर उपचार व्हावा यासाठी बीड शिवसेनेच्या वतीने शिवसेना तालुका कार्यालय टिळक रोड बीड येथे दिंडीतील सर्व वारकऱ्यांना मोफत आरोग्य तपासणे उपचार संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी आरोग्य शिबिरास डॉक्टर औदुंबर नालपे डॉक्टर अजित जाधव डॉक्टर सुहासिनी जाधव, डॉक्टर रमेश गुंजाळ आकाश देवकते दुबाले, उषा राठोड व त्यांची सर्व टीम उपस्थित होती. जवळपास २५० ते ३०० वारकरी यांची नोंद घेऊन त्यांची तपासणी केली व उपचार केले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून बीडचे तालुकाप्रमुख संतोष भाऊ जाधव, जिल्हा सहसंघटक केशवजी दिघे, बाजार समितीचे संचालक दीपक काळे, नितीन दोडक, प्राध्यापक सुरेश गरड, संगमेश्वर आंधळकर, राहुल कागदे, नरेश मुंदडा, जयदीप सवाई, विवेक सवाई, रुद्र दोडके, सार्थक जाधव व इतर शिवसैनिक मित्रपरिवार उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT